# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यानगर, राजाराम कॉलेज जवळ, कोल्हापूर,
पिनकोड - 416004 दुरध्वनी क्र.- (0231) - 2521038
ईमेल - stores.gpkolhapur@dtemaharashtra.gov.in

## निविदा सूचना

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर या संस्थेतील सफाई कामाचे कंत्राट देणेकरीता निविदा मागवीण्यात येत आहेत. अधिक माहितीसाठी संस्थेच्या gpkolhpur.org.in या संकेतस्थळास भेट दयावी.

**(कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे),**
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

महाराष्ट्र शासन

जा.क्र.शातंको/कर्मशाळा-भांडार/२०२४-२५/3467
दिनांक २५/११/२०२४.

**जिमाका/को/जाहि/का-४/१२९/२४-२५**

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यानगर, राजाराम कॉलेज जवळ, कोल्हापूर, पिनकोड - ४१६ ००४

दुरध्वनी क्र.- (०२३१) - २५२१०३८ ईमेल -stores.gpkolhapur@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. शातंको/कर्मशाळा /2024-25/ 3467 दि. 25-11-2024

## निविदा सूचना

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर या संस्थेमध्ये खालील कामाच्या कंत्राटी सेवेकरीता शासन नोंदणीकृत संस्थाकडून दोन लिफाफा पध्दतीने मोहोरबंद लखोटयात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | निविदा शुल्क | निविदा सादर करण्याचा कालावधी | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| 01. | संस्थेच्या इमारती, वसतिगृह येथील साफसफाई व स्वच्छता कंत्राटी सेवा. (आवश्यक साहित्य व साधन सामुग्रीसह) | रू. 2,000/- ( ना परतावा ) | 06-12-2024 | 26-12-2024 |

को-या निविदा या संस्थेचे संकेतस्थळ gpkolhapur.org.in येथे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. इच्छुक कंत्राटदारांनी संकेतस्थळावरुन Print घ्यावी. प्राप्त होणा-या निविदा दिनांक 30/12/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता संस्थेत मा. प्राचार्य यांच्या कक्षात उघडण्यात येतील. काही कारणास्तव निविदा उघडण्याची दिनांक व वेळेमध्ये बदल झाल्यास त्याबाबतची सूचना स्वतंत्र सूचना फलकावर लावण्यात येईल.

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यानगर, राजाराम कॉलेज जवळ, कोल्हापूर, पिनकोड - 416 004

फोन नंबर- (0231) - 2521038ईमेल -stores.gpkolhapur@dtemaharashtra.gov.inफॅक्स नंबर - (0231) - 2521016


## साफसफाई/स्वच्छता कामासाठी कंत्राटी सेवेबाबत सर्वसाधारण अटी व शर्ती

1. सदर कामाच्या निविदा अकरा महिने या कालावधीकरीता मागविण्यात आलेल्या आहेत.
2. निविदा सादर करणारी संस्था शासन नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. (साक्षांकित प्रत जोडण्यात यावी.)
3. आपल्या संस्थेस लागु असल्यास सेवाकर नोंदणी क्रमांक, व्यवसाय कर व आयकर नोंदणी इत्यादीच्या साक्षांकित प्रमाणपत्रे जोडण्यात यावी.
4. संबंधित संस्थेकडे शैक्षणिक संस्थेची अथवा इतर कार्यालयाची स्वच्छता करण्याचा अनुभव असल्यास प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत जोडण्यात यावी.
5. निविदा सादर करण्यापूर्वी या संस्थेच्या परिसरातील सर्व इमारतींचा आढावा निविदा सादर करणा-या संस्थेने घेणे गरजेचे आहे. संस्थेतील इमारतीनिहाय क्षेत्रपळाचा अंदाजे तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | इमारतीचे नांव | ड्राय एरीया (Dry Area) चौ. मी. | वेट एरीया (Wet Area) चौ. मी. |
|---|---|---|---|
| अ) | संस्थेच्या इमारती | | |
| 1 | जागतिक बँक इमारत | 1650 | 194 |
| 2 | आय टी इमारत | 1140 | 300 |
| 3 | परीक्षा विभाग | 49 | 5 |
| 4 | ग्रंथालय इमारत | 137 | 70 |
| 5 | धातुशास्त्र व शर्करा तंत्र इमारत | 103 | 15 |
| 6 | कर्मशाळा इमारत | 175 | 12 |
| | एकुण- | 3254 | 596 |
| ब) | संस्थेच्या वसतीगृह इमारती | | |
| 1 | मुलांचे वसतिगृह | 660 | 250 |
| 2 | मुलींचे वसतिगृह | 650 | 240 |
| | एकुण- | 1310 | 490 |
| | एकुण अ + ब | 4564 | 1086 |

६. सेवा पुरवठादार संस्थेस त्यांनी सदर कामास नेमलेल्या कर्मचा-यांची व मशिनरीची यादी संस्थेमध्ये जमा करणे आवश्यक राहील. नेमलेल्या कर्मचा-यांमध्ये वॉशरुम संख्या निहाय महीला कर्मचारी असणे आवश्यक राहील. तसेच सदर कर्मचा-याच्याविरुध्द कोणताही गुन्हा नोंद नसल्याबात प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

७. सर्व सफाई कर्मचारी सेवा पुरवठा संस्थेच्या लोगो निहाय गणवेषात व ओळखपत्रासह असावेत.

---

कंत्राटदार संस्थेचे नांव- ..............................................................

अधिकृत स्वाक्षरीदाराचे नांव व स्वाक्षरी- ..............................................................

शासकीय तंत्रनिकेतन

८. सदरहू सेवा पुरवितेवेळी शासकीय संस्था व परिसरामध्ये कोणतीही मोडतोड व वस्तुंचे नुकसान होणार नाही याबाबतची दक्षता सेवा पुवठादार संस्थेने घ्यावयाची आहे. अशा प्रकारचे नुकसान झाल्यास त्याबाबत नुकसान भरपाई **चालू बाजारभावाने** आकारण्यात येईल.

९. सेवा पुरवठादार संस्थेच्या कर्मचा-यास काही अपघात, इजा झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सेवा पुरवठादार संस्थेची राहील. सर्व कर्मचा-यांचा ग्रुप इन्शुरन्स ठेकेदारांनी काढावयाचा आहे.

१०. कामगार कायदेपालन करणे हे सेवा पुरवठादार संस्थेस बंधनकारक राहील. (उदा. बालकामगार नसावेत, कामगारांची नियमित वैद्यकीय तपासणी, किमान वेतन, विमा इत्यादी.) सदर बाबीची पुर्तता न झाल्यास ही संस्था याबाबत जबाबदार राहणार नाही व त्या बाबतील होणा-या कार्यवाहीस निविदाधारक जबाबदार राहतील.

११. एखाद्या दिवशी काम असामाधनकारक असल्याचे रिपोर्टींग ऑफीसर यांच्या अहवालानुसार निदर्शनास आल्यास त्या दिवसाची सरासरी रक्कम देयकातून कपात करण्यात येईल.

१२. शैक्षणीक, कार्यालय या इमारतीमध्ये कामगारांनी सकाळी ८.०० ते संध्या. ४.०० वाजेपर्यंत दोन सत्रामध्ये संस्थेत कामासाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. सर्व शैक्षणिक इमारतीचा पॅसेज सकाळी ९.०० वाजण्यापूर्वी झाडून स्वच्छ करणे बंधनकारक राहील. वसतीगृहामध्ये सकाळी १०.०० ते ६.०० या वेळेत उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१३. शैक्षणिक संस्था असल्याने कोणत्याही कर्मचा-यांकडून गैरवर्तन घडू नये याची जबाबदारी सेवा पुरवठादार संस्थेस बंधनकारक राहील व तसे घडल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

१४. निविदा सादर करतेवेळी रू. १०,०००/- (अक्षरी रू. दहा हजार फक्त) E.M.D. डिमांड ड्राफट, राष्ट्रीयकृत बँकेचा कोल्हापूर येथे वटणारा प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर यांचे नांवे देणे बंधनकारक आहे. निविदा स्विकृत न झालेल्या संस्थेस सदर डिमांड ड्राफट परत करणेत येईल. तसेच, अंतिम निविदाधारकास सिक्युरिटी डिपॉझिट संस्थेस दिल्यानंतर E.M.D. परत करण्यात येईल व कंत्राट स्विकृतीनंतर रूपये ५००/- च्या स्टँप पेपरवर विहित नमुन्यात करारनामा करून देणे सेवा पुरवठादार संस्थेस बंधनकारक राहील. E.M.D. वर कसल्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१५. अंतिम स्विकृत निविदाधारकास वार्षिक ठेका रकमेच्या ५% रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणून या संस्थेकडे रोख जमा करणे बंधनकारक राहील. सदर रकमेवर ठेका संपुष्टात आल्यानंतर परत करण्यात येईल. सदरहू रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१६. निविदा भरलेल्या संस्थेने दिलेली माहिती व दाखले चुकीचे किंवा खोटे आढळून आल्यास सदर संस्थांनी सादर केलेल्या निविदा रद्द करण्याचे अधिकार संस्था प्रमुखांकडे राहतील.

१७. सदर रकमेत सदर कालावधीसाठी काहीही बदल होणार नाही. तसेच, कंत्राट पुढे चालू ठेवणेबाबतचे सर्व अधिकार संस्था प्रमुखाकडे राहतील.

१८. स्वच्छता व साफसफाई कामसाठी लागणारे आवश्यक साहित्य व उपकरणे (उदा. फिनेल, ॲसिड, डांबर गोळया, झाडू, खराटे इत्यादी) सेवा पुरवठादार संस्थेने पुरवावयाचे आहे. हे साहित्य उत्तम प्रतिचे असणे व योग्य प्रमाणात वापरणे सेवा पुरवठादार संस्थेस बंधनकारक राहील. कचरा व्यवस्थापन, विल्हेवाट याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

---

कंत्राटदार संस्थेचे नांव- ..........................................................................

अधिकृत स्वाक्षरीदाराचे नांव व स्वाक्षरी- ..........................................................

शासकीय तंत्रनिकेतन

१९. संस्था परिसरामधील सर्व इमारती जसे जागतिक बँक इमारत, ग्रंथालय इमारत, कर्मशाळा इमारत, मुलांचे व मुलींचे वसतिगृह यामधील जीने, व्हरांडे साफ करून ओल्या कापडाने स्वच्छ करणे सेवा पुरवठादार संस्थेस बंधनकारक राहील. सदर काम झालेनंतर संस्था आवारातील गवत काढणे, परीसर स्वच्छ ठेवणे इत्यादी कामे करावी लागतील. तसेच विषेश प्रसंगी- जसे की परीक्षा, समिती भेटी अथवा राष्ट्रीय कार्यक्रमावेळी व इतर कार्यक्रमांच्यावेळी आवश्यक काम करावे लागेल.

२०. जागतिक बँक इमारत, ग्रंथालय इमारत, कर्मशाळा इमारत यामधील सर्व प्रसाधनगृह, स्नानगृह, मुता-या, वॉश बेसीन इत्यादी रोज स्वच्छ करणे आवश्यक आहे. तसेच मुलांचे व मुलींचे वसतिगृह यामधील सर्व प्रसाधनगृह, स्नानगृह, मुता-या, वॉश बेसीन इत्यादी दैनंदिन स्वच्छता करणे आवश्यक राहील. या सर्व ठिकाणी आरोग्यशास्त्रानुसार स्वच्छता ठेवणेच्या दृष्टीने (Hygene) नियमित स्वरुपात साबण पावडर, डांबरगोळया, फिनाईल, ॲसिड यांचा वापर करणे सेवा पुरवठादार संस्थेस आवश्यक राहील.

२१. सेवा पुरवठादार संस्थेस संस्थेतील महिला प्रसाधनगृह व मुलींचे वसतिगृह यामधील स्वच्छता /साफसफाई महिला कर्मचा-यांकडूनच करणे बंधनकारक राहील.

२२. सेवा पुरवठादार संस्थेस दैनंदिन स्वच्छतेचा अहवाल संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचा-याच्या स्वाक्षरीसह (वसतिगृहामधील संबंधित कर्मचारी-विद्यार्थी यांचे स्वाक्षरीसह) दररोज वसतिगृह कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील व जागतिक बँक इमारत व इतर शैक्षणिक इमारतीचा अहवाल कार्यालय प्रमुखांचेकडे सादर करावा.

२३. सेवा पुरवठादार संस्थेने स्वयंचलित व आत्याधुनिक स्वच्छता उपकरणांच्यासाहयाने सर्व इमारतीमधील स्वच्छता १५ दिवसातून एकदा करणे बंधनकारक राहील.

२४. वरील कामाव्यतिरीक्त संस्थेच्या वसतिगृह/संस्थेच्या सार्वजनिक बांधकाम विभाग समन्वयक यांचेकडून वेळोवेळी प्राप्त सुचनेचे पालन करणे बंधनकारक राहील.

२५. सदर सेवा मुदतीनंतर आपोआप रद्य होईल तसेच कोणत्याही कारणास्तव कोणत्याही वेळी पूर्वसुचना न देता कोणतेही कारण न देता सदर कंत्राट रद्य करण्याचे अधिकार संस्थाप्रमुखांकडे राहतील.

२६. सदर सेवेचे कंत्राट आपणांकडून रद्य करावयाचे असल्यास आपणांस एक महिना अगोदर लेखी पूर्व सुचना या कार्यालयास द्यावी लागेल.

२७. शासकीय नियमाप्रमाणे देयकास लागू असणारे सेवा कर, आयकर इत्यादीची कपात देयकातून या कार्यालयाकडून करण्यात येईल. देयक रक्कम शासनाकडील अनूदान उपलब्ध झालेनुसार अदा करण्यात येईल.

२८. **उपरोक्त अट क्रं. १ ते २७ पैकी कोणत्याही एक किंवा अधिक अटींचे पालन न झाल्यास अथवा सेवा पुरवठादार संस्थेचे काम समाधान कारक होत नसल्यास कोणतेही कारण न दाखवता संबंधितांचे कंत्राट रद्य करण्यात येईल व अशा संस्थेचे नांव काळया यादीत (Black List) टाकण्यात येईल.**

---

कंत्राटदार संस्थेचे नांव- ..............................................................................

अधिकृत स्वाक्षरीदाराचे नांव व स्वाक्षरी- ..............................................................

२९. **अंतिम स्विकृत निविदाधारकास त्यांनी नमूद केलेल्या दरामध्ये कंत्राटी सेवा पुरविणे बंधनकारक राहील. तसेच कंत्राटी सेवा सुरू केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव सेवा पुरविणे बंद केल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्या संस्थेचे नांव काळया यादीत (Black List) टाकून त्यांना भविष्यात या संस्थेतील निविदा भरण्यास बंदी करण्यात येईल.**

३०. **अकरा महिन्याचे काम समाधानकारक झाल्यास कामाचा कालावधी वाढवून देण्याचे अधिकार प्राचार्य यांना राहतील.**

३१. उपरोक्त नियम व अटीमध्ये बदल करण्याचे, सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे तसेच काम विभागून देण्याचे अधिकार प्राचार्याकडे राखून ठेवलेले आहेत.

३२. GST / PF / ESI सारख्या अन्य करांबाबतची कार्यवाही सेवा पूरवठार संस्थेला बंधनकारक राहील.

३३. निविदा मंजूर झाल्यानंतर सेवा पुरवठादाराने आदेशापसून ०५ दिवसांच्या कालावधीत काम सुरु करणे आवश्यक आहे.

---

कंत्राटदार संस्थेचे नांव- ..........................................................................

अधिकृत स्वाक्षरीदाराचे नांव व स्वाक्षरी- ..........................................................

शासकीय तंत्रनिकेतन
सत्यमेव जयते
कोल्हापूर

# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यानगर, राजाराम कॉलेज जवळ, कोल्हापूर, पिनकोड - 416 004

फोन नंबर- (0231) - 2521038ईमेल -stores.gpkolhapur@dtemaharashtra.gov.inफॅक्स नंबर - (0231) - 2521016


## निविदाधारकांना महत्वाच्या सूचना

इच्छुक निविदाधारकांनी या संस्थेच्या इमारतीमधील साफसफाईच्या कंत्राटी सेवेकरीताच्या निविदा या संस्थेने विक्री केलेल्या निविदा फॉर्ममध्येच सादर करणे आवश्यक आहे. निविदा कागदपत्रे क्रं. १ व २ च्या मोहोरबंद लखोटयात सादर करावयाची आहेत. लखोटा क्रं.१ मध्ये पुरविलेल्या कागदपत्रांची छाननी होवून पात्र निविदाधारकांचाच लखोटा क्रं.२ उघडण्यात येईल. निविदाधारकांनी खालीलप्रमाणे नमूद केल्यानूसार निविदा सादर करावयाची आहे.

**लखोटा क्रं. १ :- या लखोटयामध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे देण्यात यावीत.**

१. संस्था नोंदणी दाखल्याची साक्षांकित प्रत. नोंदणी दि.३१.०३.२०२० पुर्वीची असावी. जी.एस.टी प्रमाणपत्र, पी. एफ. प्रमाणपत्र, ई. एस.आय.सी प्रमाणपत्र यांची प्रत जोडावी.

२. आपल्या संस्थेस लागू असल्यास सेवाकर, व्यवसाय कर व आयकर नोंदणी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.

३. संस्थेचे काम करण्याचे कार्यक्षेत्राबाबत स्पष्ट उल्लेख असलेबाबत संस्थेच्या पोट नियमांची संबंधित निबंधकाची प्रमाणित केलेली प्रत (Byelaws) (लागू असल्यास)

४. निविदा शुल्क रु. २,०००/- व EMD डिमांड ड्राफ्ट रू. १०,०००/- प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर यांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेचा स्वतंत्रपणे काढण्यात यावा.

५. कंत्राटदार संस्थेचा अनुभवाचा तपशिल (प्रपत्र अ) व अनुभवासंबंधी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रत/प्रती. शैक्षणीक संस्था अनुभव प्रमाणपत्र प्राधान्याने सादर करावे.

६. कंत्राटी सेवेबाबत सर्वसाधारण व संबंधी अटी व शर्ती मान्य असल्याचे कंत्राटदाराच्या स्वाक्षरीचे हमीपत्र (प्रपत्र - ब)

**टिप — उपरोक्त नमूद केलेल्या कागदपत्रांची पूर्तता होत नसल्यास अशा निविदाधारकांची निविदा तात्काळ रदद करण्यात येईल व त्यांचा लखोटा क्रं. २ उघडण्यात येणार नाही यांची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.**

**लखोटा क्रं. २ :- यामध्ये खालील नमूद केलेली कागदपत्रे सादर करावयाची आहेत.**

या कार्यालयाकडून प्राप्त करून घेतलेली व सेवा पुरवठादाराने संपूर्ण माहिती भरलेली मूळ निविदा

**लखोटा क्रं. ३ :- यामध्ये खालील नमूद केलेली कागदपत्रे सादर करावयाची आहेत.**

यामध्ये लखोटा क्रं. १ व लखोटा क्रं.२ सादर करावयाचे आहे. सर्व लखोटे मोहोरबंद करणे आवश्यक आहे

---

कंत्राटदार संस्थेचे नांव- ..........................................................................

अधिकृत स्वाक्षरीदाराचे नांव व स्वाक्षरी- ..........................................................

शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

(संस्थेच्या पत्रावर खालील माहिती भरावी.)

**<u>प्रपत्र –अ</u>**

## कंत्राटी सेवा पुरविणा-या संस्थेच्या अनुभवाचा तपशिल

| अ.क्र. | यापूर्वी काम केलेल्या संस्थेचा तपशिल | कालावधी | | संबंधित संस्थेचा फोन नं. |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

कंत्राटदार संस्थेचे नांव – ----------------------------------------------------

अधिकृत स्वाक्षरीदाराचे नाव – ----------------------------------------------

अधिकृत स्वाक्षरीदाराची स्वाक्षरी – -------------------------------------------

दूरध्वनी / भ्रमणध्वनी (मोबाईल नं.) - ----------------------------------

कंत्राटदार संस्थेचा शिक्का

शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

प्रपत्र –ब

# हमीपत्र

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथील साफसफाई/स्वच्छता कामासाठी कंत्राटी सेवेबाबतचे सर्व नियम व अटी मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. सर्व नियम व अटी काटेकोरपणे पालन करणे मला (कंत्राटदार संस्था) बंधनकारक राहील याची मी संस्थेच्या वतीने हमी देत असून मी माझी स्वाक्षरी करीत आहे.

कंत्राटदार संस्थेचे नांव – -----------------------------------------------------

अधिकृत स्वाक्षरीदाराचे नाव – ------------------------------------------------

अधिकृत स्वाक्षरीदाराची स्वाक्षरी – ------------------------------------------

दूरध्वनी / भ्रमणध्वनी (मोबाईल नं.) - ----------------------------------

कंत्राटदार संस्थेचा शिक्का

# साफसफाई/स्वच्छता कामासाठी कंत्राटी सेवेबाबत निविदा फॉर्म नमुना

**महत्वाचे-**

१. सदर माहिती निविदाकारांनी त्यांचे संस्थेच्या लेटरहेड वरती दयावयाची आहे.
२. सदर कामाकरीता शैक्षणीक इमारती व वसतीगृह असे दोन दर मागवीण्यात येत आहेत. परंतु काम देताना एकत्रीत दरांवरती तुलना करुन एकत्रीत काम देण्यात येईल.

## लखोटा-२

दिनांक:-

प्रति,
मा. प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

विषय:- संस्थेतील इमारतीमधील साफसफाई कामाकरीता कंत्राटी तत्वावर सेवा पुरविणेबाबत.

महोदय,

आपल्या दिनांक .... / .... /२०२४ रोजीच्या निविदा सूचनेनुसार खालीलप्रमाणे निविदा सादर करीत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर प्रती महिना सर्व करांसह |
|---|---|---|
| १ | आपल्या संस्थेच्या इमारतीमधील साफसफाई कामाकरीता कंत्राटी सेवेसाठी आकारण्यात येणारी रक्कम | रु.---------------------------------------<br>अक्षरी रु.--------------------------------- |
| २ | आपल्या संस्थेच्या वसतीगृहाच्या इमारतीमधील साफसफाई कामाकरीता कंत्राटी सेवेसाठी आकारण्यात येणारी प्रतिमहा रक्कम | रु.----------------------------------------<br>अक्षरी रु.---------------------------------- |
| | **एकुण रक्कम अ.क्र. १+ २** | रु.----------------------------------------<br>अक्षरी रु.-------------------------------- |

माहिती पत्रामध्ये दिलेल्या सर्व अटी व शर्ती या संस्थेस मान्य असून सदर सेवा ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी सेवा पुरविण्यास ही संस्था तयार आहे.

कंत्राटदार संस्थेचे नांव – -------------------------------------------------

अधिकृत स्वाक्षरीदाराचे नाव – ---------------------------------------------

अधिकृत स्वाक्षरीदाराची स्वाक्षरी – ----------------------------------------

दूरध्वनी / भ्रमणध्वनी (मोबाईल नं.) - ----------------------------------

शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

कंत्राटदार संस्थेचा शिक्का